# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913


**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२४/ 2976

दिनांक :- 03 NOV 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**

शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती / यवतमाळ / वाशिम / खामगांव / मुर्तिजापुर.

डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती (अनुदानित)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील संचालनालयातंर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यां तपासणीबाबत.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागांतर्गत सोबत जोडलेल्या जिल्हा निहाय यादीतील शासकीय / अनुदानित, विनाअनुदानित संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ च्या प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यांची ऑफलाईन व ऑनलाईन तपासणी करावयाची आहे. प्रत्येक संस्थेकरीता तपासणी करण्याकरिता आपले संस्थेतील अधिका-यांची नियुक्ती करुन गुणवत्ता याद्या **दिनांक ०६/११/२०२५ ते ११/११/२०२५ पर्यंत** तपासून संबंधीत संस्थेला **दिनांक १२/११/२०२५ पर्यंत** या कार्यालयास सादर करण्याबाबत सुचवावे व नियुक्ती आदेशाची प्रत या कार्यालयास सादर करावी. (तपासणी अधिकारी यांचे नियुक्ती आदेशाचा प्रोफार्मा सोबत जोडला आहे) तसेच सदर गुणवत्ता याद्यांची तपासणी करतांना काही अडचणी उद्‌भवल्यास विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा. गुणवत्ता याद्यांची तपासणीच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आपणाकडे google form पाठविण्यात येईल त्यांमध्ये आपण गुणवत्ता यादीच्या अनुषंगाने आखलेल्या कार्यक्रमाची माहिती सादर करावी. (जसे तपासणी अधिका-याचे नांव, पदनाम, संस्था, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक व तपासणीकरीता नेमूण देण्यात आलेली संस्था)

गुणवत्ता याद्या तपासणी करण्याकरिता एक विभागप्रमुख किंवा जेष्ठ अध्यापकाची समन्वयक म्हणुन नियुक्ती करावी व त्यांचे नांव, पद या कार्यालयास कळवावें. तसेच तपासणी अधिकाऱ्यांची नियुक्ती आपल्या स्तरावर करुन, संबधीत तपासणी अधिकाऱ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेशाची माहीती पुस्तिका (HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT INFORMATION BROCHURE FULL TIME TECHNICAL DIPLOMA COURSE FOR THE ACADAMIC YEAR 2025-26) मध्ये व संदर्भीय पत्रात दिलेल्या सुचनांप्रमाणे तपासणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देश द्यावेत. तसेच पडताळणी करतांना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थाकडुन व्दितीय वर्षाकरीता मुदतठेवीचा हप्ता मा.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही, याची पडताळणी करावी. भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. मुदत ठेव पावती संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण म.रा., मुंबई यांच्या संयुक्त नावाने असल्याची खात्री करुन त्यासबंधी सर्बधित बँकेचे प्रमाणपत्र संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावे. तसेच सर्वच संस्थांनी मुदतठेव ठेवल्याबाबतची तपासणी करुन गुणवत्ता यादीसोबत जोडण्यास कळवावे.

२) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ज्या संस्थांना नविन अभ्यासक्रम/सुरू असलेल्या अभ्यासक्रमामध्ये वाढ व नविन संस्था सुरु करण्यास मंजुरी मिळालेली आहे अश्या संस्थांनी या कार्यालयाची तपासणी शुल्क भरल्याबाबत कागदपत्रे वाढिव अभ्यासक्रमाचे ठेव ठेवल्याची पावती व अंतिम मान्यता प्रमाणपत्रे इत्यादी तपासावे.

३) संस्थांची तपासणी करतांना त्यांना मिळालेली एआयसीटीई /पीसीआय/संचालक/महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेची पत्रे तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता आहे किंवा नाही तपासावे व ते गुणवत्ता यादीसोबत जोडण्यास कळवावे.

४) संबंधीत संस्थांव्दारे सादर करण्यात आलेली प्रवेशित विद्यार्थ्याची यादी संबंधीत संस्थेच्या प्राचार्याच्या सही शिक्यासह गुणवत्ता यादीसोबत जोडलेली असावी. संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट केलेली रिसेन्ट यादीच तपासणी अधिकाऱ्यांनी आपल्या सही शिक्यासह प्रमाणित करावी.

५) संस्थेची ऑफ लाईन गुणवत्ता यादीची तपासणी करतांना त्याचवेळी संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन गुणवत्ता यादीची सुध्दा तपासणी करावी. ऑफलाईन प्रवेश यादी पडताळणीसाठी संस्थेला देण्यात आलेल्या संकेतांक व पासवर्डव्दारे तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळावर लॉगीन करुन प्रवेशित विद्यार्थ्याची यादीची प्रिंटआऊट घेऊन ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी कोणत्याही परिस्थितीत संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदा. Word File etc) पडताळणीकरिता वापरु नये.

६) प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर सदर संस्थेस सक्षम प्राधिकरणाची (एआयसीटीई/पीसीआय/संचालक/महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेची पत्रे तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता आहे किंवा नाही इ.) परवानगी असल्याचे कागदपत्रे तपासण्यात यावेत

७) अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्राची संस्थेच्या प्राचार्यांनी/संस्थाप्रमुखानी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी तपासणे.

८) सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादया पडताळणी करताना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे.

**९) संस्थास्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहीलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरीता सबंधित संस्थेने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहीरात, अर्ज मागविण्याचा कालावधी, प्राप्त अर्जाची गुणवत्ता यादी, प्रवेशित विद्यार्थ्याचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत किंवा नाही, इत्यादी बाबींची काळजीपुर्वक पडताळणी करण्यात यावी.**

१०) संस्थेकडून प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर शुल्क परताव्याबाबत संबंधित संस्थेबदल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा मात्र प्रवेश यादी प्रमाणित करण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येवू नये.तसेच शुल्क परतावा बाबत संस्थेकडें कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्याकडून घेण्यात यावे.

११) अल्पसंख्यांक दर्जाचा संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्याक विकास विभागाने प्रदाने केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

१२) उशिरा प्रवेश/प्रवेशित उमेदावारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही. ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येऊ नयेत. असे प्रवेश रद्दबादल ठरविण्यात यावेत व तसे या कार्यालयास कळविण्यात यावे.

१३) प्रवेश याद्या पडताळणी साठी कागदपत्रे सादर न करणा-या संस्थांमधील उमेदवारांच्या शैक्षणिक नुकसानीस सबंधित संस्थाप्रमुख व्यक्तिशः जबाबदार राहतील ही बाब संस्थांना आपल्या स्तरावरुन कळवावे. प्रवेश यादी तपासणी झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील, याची संस्थांनी नोद घ्यावी.

**१४) संस्थेने AISHE माहीती भरल्याबाबतचे प्रमाणपत्र तपासावे. तसेच NSP पोर्टलवर KYC Update केले किंवा कसे तपासावे. नसल्यास त्याबाबतची कार्यवाही करण्यास सुचवावे.**

**१५) तपासणी अधिकारी यांनी ज्या संस्थेच्या गुणवत्ता याद्यांची ऑफ-लाईन तपासणी केली आहे अशा अधिका-यानी त्याच संस्थेच्या गुणवत्ता याद्या तंत्रशिक्षण संचालनालयाकडून लॉगिन आयडी प्राप्त झाल्यानंतर ऑनलाईन सुध्दा तपासणी करावयाची आहे. तसेच संबंधीत संस्थांनी ऑनलाईन पडताळणीकरतांना पत्रात दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.**

१६) तसेच संस्थेच्या गुणवत्ता यादीमध्ये काही त्रुटी असल्यास सोबत जोडलेल्या त्रुटीपत्रकात स्वतंत्रपणे दर्शविण्यात याव्यात. सदर त्रुटी या कार्यालयाचे स्तरावर पुर्ण करुन घेतल्या जाईल. जर एखाद्या संस्थेच्या गुणवत्ता यादीमध्ये त्रुटी नसल्यास त्रुटीपत्रकावर निरंक असल्याचा शेरा नोदवावा.

. तसेच सोबत जोडलेल्या तपासणी वेळापत्रकाप्रमाणे आपल्या जिल्हयातील संस्थांना आपल्यास्तरावरुन तपासणी करण्यात यावी व वरील कालावधीत उपस्थित राहण्याबाबत संबंधीत संस्थांना आपल्यास्तरावरुन कळवावे.

**सहपत्रे :- १. वेळापत्रक २. त्रुटीपत्रक. ३. इतर प्रपत्रे.**

**(मनोज म. अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** (१) मा.संचालक, तंत्र शिक्षण,म.रा.,मुंबई यांना माहिती करिता सादर.

(२) प्राचार्य, सर्व शासकीय /अनुदानित / विना-अनुदानित प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी / वास्तूशास्त्र पदविका संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना अग्रेषित.

त्यांना सुचित करण्यांत येते कि, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया तीन प्रतीत तयार करुन आपल्या जिल्हयातील शासकीय तंत्र निकेतनातील नियुक्त केलेल्या समन्वय अधिकारी, तपासणी अधिका-यांशी संपर्क करुन, ऑफलाईन व ऑनलाईन गुणवत्ता यादया तपासणीचे काम **दिलेल्या सुचनेप्रामणे व वेळापत्रानुसार दिलेल्या मुदतीच्या आत त्वरीत पूर्ण करुन घ्यावे.** सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात योग्य ती माहिती प्रत्येक गुणवत्ता यादयासोबत जोडावयाची आहे. गुणवत्ता याद्या तयार करण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास तात्काळ या कार्यालयास संपर्क करावा. तसेच गुणवत्ता याद्यांची सोबतच्या वेळापत्रकानुसार तपासणी करुन घेण्याबाबत दक्षता घ्यावी. गुणवत्ता यादी तपासणीकरीता आवश्यक सर्व मुळ कागदपत्रासह आपल्या कार्यालयातील जाणकार प्राध्यापक / कर्मचारी यांना सबंधित संस्थेत प्रतिनियुक्त करावे. शासकीय संस्थाकडुन यांदया तपासुन आल्यानंतर संस्थांनी या कार्यालयाशी संपर्क साधावा व या विभागीय कार्यालयाने प्रमाणित केलेली यादी व ऑनलाईन पोर्टलवर सहसंचालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र डाऊनलोड करुन महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, नागपुर तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना सादर करावयाची आहे. तेव्हा दिलेल्या मुदतीत या कार्यालयास उपरोक्त प्रमाणे तपासणी अधिका-याकडुन तपासुन सही शिक्यानिशी प्रमाणित करुन दिलेल्या मुदतीत गुणवत्ता याद्या या कार्यालयास सादर कराव्यात, याबाबतची संपुर्ण जबाबदारी संस्थेची राहिल, याची नोंद घ्यावी. सोबत जोडलेल्या यादीमध्ये एखाद्या संस्थेचे नाव समाविष्ट नसल्यास तसे या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा.

३) प्रोग्रामर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करण्याकरीता संस्थेची यादी व वेळा पत्रक

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Intake | District | Inspection Date | Place of Verification |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1006 | Government Polytechnic,Murtizapur,Akola | 300 | Akola | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Government Polytechnic, Murtizapur Dist Akola |
| 2 | 1275 | Manav School of Polytechnic, Vyala, Tal.Balapur, Akola | 240 | Akola | | |
| 3 | 1116 | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola (Diploma Architecture) | 40 | Akola | | |
| 4 | 1008 | Government Polytechnic,Amravati | 690 | Amravati | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Government Polytechnic, Amravati |
| 5 | 1007 | Shree Shivaji Education Society's Dr. Panjabrao Deshmukh Polytechnic, Amravati | 180 | Amravati | | |
| 6 | 1139 | Shree Shivaji Education Society's Dr. Panjabrao Deshmukh Girls Polytechnic, Amravati | 108 | Amravati | | |
| 7 | 1277 | Takshshila Polytechnic, Amravati. | 240 | Amravati | | |
| 8 | 1123 | Indira Bahuuddeshiya Shikshan Sanstha's Dr. Rajendra Gode Polytechnic,Ghatkhed, Amravati | 180 | Amravati | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Shree Shivaji Education Society's Dr. Panjabrao Deshmukh Polytechnic, Amravati |
| 9 | 1247 | Shri Dadasaheb Gavai Charitable Trust's Vikramshila Polytechnic,Darapur, Tal. Daryapur, Dist. Amravati | 240 | Amravati | | |
| 10 | 1289 | P.R. Patil College of Architecture, Amravati (Diploma Architecture) | 40 | Amravati | | |
| 11 | 1153 | Adarsha Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal, Dr. R . N. Lahoti Polytechnic, Sultanpur,Buldhana | 300 | Buldhana | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Governmet Polytechnic, Khamgaon, Dist Buldhana |
| 12 | 1182 | Padmashri Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur, Buldhana | 120 | Buldhana | | |
| 13 | 1244 | Bhiwsan Patil Shinde Shikshan Gramin Vikas & Bahu Sanstha,Shinde Polytechnic, Anjani Bk Tal: Mehkar, Dist: Buldhana | 300 | Buldhana | | |
| 14 | 1125 | Rajarshi Shahu College of Engineering, Buldhana | 180 | Buldhana | | |
| 15 | 1268 | Siddhivinayak Technical Campus, School of Engineering & Research Technology, Shirasgon, Nile,Buldhana | 180 | Buldhana | | |

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Intake | District | Inspection Date | Place of Verification |
|---|---|---|---|---|---|---|
| 16 | 1009 | Government Polytechnic,Khamgaon,Buldhana | 360 | Buldhana | | |
| 17 | 1130 | Vision Buldhana Educational & Welfare Society's Pankaj Laddhad Institute of Technology & Management Studies, Yelgaon | 180 | Buldhana | | |
| 18 | 1010 | Government Polytechnic,Washim | 360 | Washim | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Government Polytechnic, Washim |
| 19 | 1011 | Government Polytechnic,Yavatmal | 300 | Yavatmal | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Government Polytechnic, Yavatmal (New) |
| 20 | 1150 | Swavalambi Shikshan Sanstha's Sushganga Polytechnic, Wani,Yavatmal | 300 | Yavatmal | | |
| 21 | 1151 | 1151 - Late Ahilyabai Kakade Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal, Sai Polytechnic,Kinhi(J),Yavatmal | 210 | Yavatmal | | |
| 22 | 1015 | Government Polytechnic,Achalpur, | 210 | Amravati | 06 to 07 Nov. 2025 & 10 to 11 Nov. 2025 | Government Polytechnic, Achalpur Dist Amravati |

I/c Joint Director,
Technical
Education,Amravati

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ गुणवत्ता यादीतील त्रुटया दर्शविणारे विवरणपत्र

संस्थेचे नांव:-

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव (प्रथम वर्ष / व्दितीय वर्ष / व शाखा स्पष्ट नमुद करावी) | CAP /ACAP /IL असे नमुद करावे. EWS | यादीतील अ.क्र. | त्रुटी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

तपासणी अधिका-याची स्वाक्षरी

# संस्थेचे लेटर हेड

(शासकीय तंत्रनिकेतन यांनी तपासणी अधिकारी यांचे तपासणीचे आदेश याच प्रोफार्मामध्ये काढावे)

**कार्यालयीन आदेश**

जावक क्रमांक :-
दिनांक :-

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यांची पडताळणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.सहसंचालक, तंत्र शिक्षण वि.का. अमरावती यांचे पत्र क्र.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम / थेट व्दितीय अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करण्याकरीता खालील अधिका-यांना नियुक्ती करण्यात येत आहे_______________ ______________________________________________________

______________________________________________________________________

| तपासणी करावयाच्या संस्थेचा डीटीई कोड | संस्थेचे नांव | प्रथम वर्ष / थेट व्दितीय वर्ष | तपासणी अधिका-याचे / अधिव्याख्यता यांचे नांव | तपासणी अधिकारी यांचा ई-मेल | तपासणी अधिकारी यांचा मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन ____**

**प्रत :-** १. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीकरीता सादर.

२. संबंधीत तपासणी अधिकारी / अधिव्याख्याता, शासकीय तंत्रनिकेतन,--------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Website:** www.jdroamt.org
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in
**Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२५/
दिनांक :-

## :- प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ गु यादी/ २०२५/------------, दि.------------ तसेच प्राचार्य, ______________ ________________, ___________________ यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ______________________________________ नुसार (संस्थेचे नांव)______________________________________ या संस्थेच्या अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास / वास्तूशास्त्र पदवीका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया (CAP) / संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेऊन संस्थेकडे अर्ज व अर्जासोबत जोडलेली विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे सादर केली आहेत, त्या सर्व अर्ज व प्रमाणपत्रांची शासनाचे नियम व प्रवेश नियमावलीनुसार तपासणी करुन गुणवत्ता यादी तपासली आहे. ज्या उमेदवारांच्या बाबतीत त्रूटी आढळल्या त्यांचे बाबतीत सुस्पष्ट अभिप्राय सर्वसामान्य गुणवत्ता यादीत तथा स्वतंत्र त्रूटी पत्रावर नमूद केल्या आहेत. तसेच प्रवेश यादीत असलेल्या प्रत्येक उमेदवाराचे नांव गुणवत्ता यादीत असल्याची खात्री करुन घेतली आहे.

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांव:-
पदनाम :
संस्था :

**शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांसोबत सादर करावयाची व तपासणी अधिकाऱ्यांनी तपासावयाची कागदपत्रे.**

| अ.क्र | आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे | साक्षांकित छायांकित प्रत उपलब्ध आहे / नाही. | तपासणी अधिका-यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली,, शासन मान्यता,, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली, वास्तूशास्त्र परिषद यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही. | | |
| २ | संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची सलग्नता प्राप्त आहे किंवा नाही, ते स्पष्टपणे नमुद करावे. | | |
| ३ | संस्थांनी नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्ती, यंत्रसामुग्री व अद्यायावत प्रयोगशाळा, ग्रथालय सुविधा विद्यार्थ्यांना देत असल्याबाबत हमिपत्र सादर केले किंवा नाही. | | |
| ४ | संस्था स्तरावर प्रवेश फेरीकरीता वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याची प्रत जोडली किंवा नाही. | | |
| ५ | सांखिकी माहिती विहीत प्रपत्रात आहे किंवा नाही. | | |
| ६ | संस्थेत प्राचार्याचे नियमीत पद भरले आहेत किंवा नाही, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीबाबत तसेच इतर बाबतीत तक्रारी नाहीत याबाबत स्पष्टीकरण. | | |
| ७ | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यात येते किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| ८ | रॅगिंग प्रतिबंधक समिती तसेच रंगींग प्रतिबंधकबाबत संस्थेतर्फे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे काय.. | | |
| ९ | मागासवर्गीय उमेदवाराकडून शासन निर्णयाप्रमाणे/संचालनालयाच्या आदेशाप्रमाणे शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही केली किंवा कसे? | | |
| १० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची सदर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता सलग्नता प्रमाणपत्र आहे, याची तपासणी करावी. (साक्षांकीत प्रत सोबत जोडावी ) | | |
| ११ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थानी व्दितीय वर्षाकरीता मुदतठेवीचा दुसरा हप्ता तसेच इतर मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही . | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी
नांव:-
शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांव:-
पदनाम :
संस्था :

महाराष्ट्र शासन
**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२४/
दिनांक :-

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती
## प्रपत्र -

| संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | भरलेल्या जागा | रिक्त जागा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | मुले |
| | | | | | मुली |

प्राचार्यांची स्वाक्षरी

शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांव:-
पदनाम :
संस्था :